# रेशमी संस्कारांची शिदोरी

**मेघना गोखले**

एका मोठ्या पटांगणावर गटागटात मुलं खेळत होती. एका गटातील मुलं चित्र काढत होती. समोरच्या गटातील एक ४ वर्षांची मुलगी कुतुहलाने त्या गटाजवळ येऊन बघत उभी राहिली. मग सगळ्यांची चित्र बघत-बघत गटाला एक गोल फेरी मारून परत आपल्या गटात गेली. हे दृष्य आहे सारस बागेजवळील गरवारे बालभवन ह्या क्रीडा-रंजन केंद्रातील.

१९८५ साली गरवारे बालभवन सुरू झाले आणि लवकरच प्रवेशासाठी प्रतिक्षा यादी वाढू लागली. अनेक मुलांची खेळण्याची गरज पुरी होत नसल्याची जाणीव होऊन बालभवनने वर्षातून दोनदा प्रशिक्षण शिबिरे सुरू केली. आज या प्रशिक्षणातून पुणे व आसपासच्या परिसरात ३००-३५० बालभवने कार्यरत आहेत.

बालभवनात परीक्षा घेतली जात नाही की मार्क दिले जात नाहीत, स्पर्धा घेतली जात नाही की प्रशस्तिपत्रके दिली जात नाहीत. सहभागाबद्दल तर प्रत्येकालाच सारखेच बक्षीस मिळते. मग तरीही गेली २८ वर्षे बालभवनात दररोज ५०० पेक्षा जास्त मुले उत्साहाने व नियमित येण्याइतकं बालभवनमधील त्यांना नेमकं काय आवडतं?

बालभवनचा हेतूच घरी व शाळेत निसटून जाणारे मोकळीक व प्रयोगशीलतेचे अनुभव मुलांना मोकळ्या वातावरणात देऊन मुलांचे स्वातंत्र्य जपणे हा आहे. लेखाच्या सुरूवातीस सांगितलेले दृश्यच याबाबतीत पुरेसं बोलकं आहे. त्या छोट्या मुलीची कुतुहलाची नैसर्गिक प्रेरणा जपली गेली. दुसऱ्या गटातील मुलांची चित्रे बघून येईपर्यंत तिला हटकले गेले नाही आणि तितक्याच सहजतेने ती तिच्या गटात पुन्हा सामावली गेली. आपल्यापेक्षा मोठे ताई-दादा कशी चित्र काढतात, ताईशी कसं बोलतात हे जाणून घ्यायची तिला संधी मिळाली.

शाळेतील अभ्यासाची साचेबद्धता उजव्या मेंदूला प्रेरित करण्याशी निगडीत असते तर निसर्गाचा सहवास, निरीक्षणास वाव, मुक्त चित्रकला, हस्तकला, मातीकाम, श्रमदान ह्यांचा अनुभव घेत-घेत काहीतरी करून बघत राहणे यातून मुलाच्या डाव्या मेंदूला चालना मिळते. मुलांनी बागकाम करणे, खाऊ बनविणे, हस्तकला, चित्रे काढणे व रंगवणे, मातीकाम करताना प्रयोग करत राहणे, वाळूत खेळणे असे बालभवनचे उपक्रम मुलांना स्वत:च्या हातांचा जास्तीत जास्त वापर करण्याची संधी देतात. हे सारे उपक्रम केवळ आनंददायकच नाहीत तर स्वतंत्र विचार करण्याची प्रेरणा देणारे, समाधान देणारे असून मेंदूच्या विकासासाठीही अत्यंत पोषक आहेत.

बालभवनात मुलं इतकं सारं 'करून' बघतात, स्पर्धा न करता अनेक अनुभव घेतात याबद्दल पालकांना काय वाटते याचा आढावा पालकांकडून प्रश्नावली भरून घेऊन गरवारे बालभवनाने काही दिवसांपूर्वी घेतला. पालकांनी ह्या प्रश्नावलीला विचारपूर्वक, सखोल व अनेक अंगांनी उत्तरे दिली.

मुलांना बालभवनामधील नेमकं काय-काय आवडतं? ह्या प्रश्नावर पालकांनी आपल्या मुलाला अनेक बाजूंनी समजून घेऊन उत्तरे दिली आहेत. पालक म्हणतात, शुद्ध हवेत, स्वच्छ मैदानात मोकळेपणाने खेळायला मिळणं, मैदानभर धावायला-बागडायला मिळणं, झाडांचा सहवास, मातीचा स्पर्श, सहलींच्या माध्यमातून निसर्गाशी जवळीक, पर्यावरणाचे नकळत येत जाणारे भान यातून मुलांची निसर्गाशी मैत्री होते. बालभवनचे ताणरहित, आनंददायी वातावरण मुलांमधील मोकळेपणा, सहजता वाढवते, सामाजीकिरणासाठी अनेक अंगांनी संधी देते. ''बालभवनात भरपूर खेळायला मिळून आमच्या मुलांची रग जिरते, खाण्याच्या तक्रारी कमी होतात. मुलं निरोगी, खेळकर व उत्साही तर राहतातच पण त्याचबरोबर त्यांना टी.व्ही., व्हिडीओ गेम्स पेक्षाही मैदानी खेळांची गोडी लागली आहे'' हे पालकांचे मत फार महत्त्वाचे आहे.

पालकांच्या मते, बालभवनमध्ये शारीरिक विकासाबरोबरच मुलांचे मानसिक, भावनिक स्वास्थ्यही जपले जाते. एखादे मूल गटातील खेळ सोडून थोडा वेळ बाहुली घरात, ट्री हाऊसवर, वाचनालयात रमले, मित्राशी पायरीवर बसून गप्पा मारल्या

तर गटाची ताई लक्ष ठेवते पण त्याला लगेच आडवत नाही, रागावत नाही. यातूनच मुलं आपल्या आवडी-निवडी ओळखायला शिकतं. मित्राशी बोलायला, संवाद साधायला व त्याचे शांतपणे ऐकून घ्यायलाही शिकत आहे याचे भान ताईला असते. मुलांच्या नैसर्गिक उर्मीही बालभवनमध्ये जपल्या जातात. घसरगुंडी खेळायला गेल्यावर एखादे मूल बोगद्यातच रमेल, तर एखादे पायऱ्यांवरून उड्या मारेल, एखादे घसरगुंडीवरून जोरात घसरण्याची मजा अनुभवेल तर दुसऱ्याला नुसते पायरीवर बसून इतर मुलं कसं खेळतात ते बघायला आवडेल. कागद हातात मिळाल्यावर एखादे मूल घड्या घालून कमळ बनवेल, तर कोणी छोट्यात छोटा बोळा करेल, कोणी कात्रीने कापून बघेल तर कोणी कागदाचा स्पर्श अनुभवेल. चांगलं-वाईट, चूक-बरोबर यात न अडकता बालभवनची ताई हे सर्व करून बघायला मुलांना वाव देते. पुन्हा-पुन्हा, वेगवेगळ्या प्रकारे अनुभव घ्यायला मुलांना अवधी देऊन स्वतंत्र विचार करायला प्रवृत्त करते. त्यामुळे सक्तीचे, साचेबद्ध असे काही न राहता, मुलं आवडीने, मोकळेपणाने व जबाबदारीने साहित्य-माध्यम हाताळू लागतात. मुलांना शिकवलेलं सगळं जमायला लागलं का हे पाहण्यापेक्षा मुलांना वेगवेगळ्या कला-प्रकारांचा आविष्कार माध्यमांचा अनुभव मिळतोय ना त्यातून आपली आवड-निवड जोखण्याची संधी मिळतेय ना यावर बालभवनमध्ये भर दिला जातो.

ेगरवारे बालभवनच्या संचालिका शोभाताई भागवत म्हणतात, ''बालभवनात सर्व मुलांना आवर्जून नाटकात, स्नेहसम्मेलनात सहभागी करून घेतले जाते. प्रत्येक मुल नाटकात छान काम करू शकेल असे नाही, मोठेपणी नट होईल असे नाही, पण त्याचा सर्वांसमोर बोला-चालायचा आत्मविश्वास मात्र नक्कीच वाढेल जो मोठेपणी त्याला तो कोणत्याही क्षेत्रात काम करत असला तरी उपयोगास येईल. अनेक प्रकारच्या माणसांना भेटणं, वेगवेगळी ठिकाणं पाहणं, सर्व कला, माध्यमांचा परिचय करून घेणं हा मुलांसाठी खजिनाच असतो. त्यातून मुलांचं जग मोठ्ठं होतं, व्यक्तीमत्वाचा पाया रुंदावतो.''

'बालभवनमध्ये यायला लागून मुलांमध्ये काय बदल झाला, काय प्रगती झाली?' ह्या प्रश्नावर पालकांचे प्रकर्षाने जाणवलेले उत्तर म्हणजे 'मुलं सगळ्यांमध्ये सहजतेने मिसळायला शिकले, इतरांचा आदर करायला शिकले, संघभावना, सामाजिक बांधिलकी, स्वयंशिस्त आपसूक अंगी बाणवत गेले. मुलांचा भाषिक विकास, शब्दसंग्रह तर वाढलाच पण त्याचबरोबर पुस्तकांची, वाचनाची आवड लागली. सगळ्यांसमोर आपले विचार मांडायला शिकले. व्यक्त व्हायला शिकले.'

दहीहंडीला हंडी रंगवणे, दिवाळी, किल्ला करणे, थंडीत शेकोटी करणे अशा स्वरूपाच्या खास उपक्रमांमध्ये वैविध्य तर असतेच पण त्याची पूर्वतयारी, साहित्याची निवड, नियोजन-ठरवा-ठरवी ह्या सगळ्यात मुलांना सहभाग घ्यायला मिळतो, तो मुलांना हवाहवासा वाटतो.

शोभाताई म्हणतात, ''ज्ञानाने फक्त सत्ता मिळेल, पण आत्मविश्वास, स्वावलंबन, करुणा, कल्पकता जोपासत आयुष्य आनंदी, अर्थपूर्ण बनवणे, सहजतेने, मोकळेपणाने जगायला शिकणे महत्त्वाचे. अगदी असेच तर आपले मुल घडावे असे आपल्यातील प्रत्येकालाच वाटत असते. पण गंमत अशी की, एवढ्या महत्त्वाच्या गोष्टी शिकवण्याचे कुठे क्लासेस नसतात. हे सर्व सहजतेने जोपासायची संधी मुलांना बालभवनात मिळते.

बालभवन मुलांना 'आपले' 'हक्काचे' वाटण्यात महत्त्वाचा दुवा असते 'बालभवनची ताई' - मुलांची 'आमची ताई.' ताईकडून गोष्टी ऐकणे, ताईशी गप्पामारणे, ताईने मुलांचे म्हणणे ऐकून घेणे, तिच्याकडून मोकळेपणा, विश्वास व स्वातंत्र्य मिळणे ह्या सगळ्यातून मुलांना ताई 'आपली' वाटत रहाते व घर आणि शाळेच्या विश्वाबाहेरही मुलांची मानसिक, सामाजिक वाढ निकोप होत रहाते. अनेक वर्षे बालभवनच्या कामाचा अनुभव असणाऱ्या ताया नवीन तायांना सहजतेने सामावून घेतात. ताईला मिळणारी वागणूक थेट मुलांपर्यंत पोहोचते हे ओळखून तायांना विश्वासाने, सन्मानाने वागवणारे बालभवन मुलांशीही प्रेमाचे नाते जोपासते. कौशल्याबरोबरच नाविन्य व वैविध्य जोपासत केलेल्या प्रयोगांसाठी बालभवनात तायांना नेहमीच प्रोत्साहन दिले जाते. त्यांच्या प्रयोगशीलतेचे कौतुक बालभवनात केले जाते आणि त्यामुळेच ताया एका पठडीतील न राहता हसतमुख, ताज्यातवान्या, सतर्क व उत्साही असतात.

बालभवनात येणाऱ्या प्रत्येक लहान मुलाचे वेगळेपण ताईने फुलवलेले असते, तिच्या मनातही जपलेले असते आणि मुलं

मोठी झाल्यावर ताईला भेटायला आली की तिच्या आठवणीतून ती मुलांना त्यांच्या ह्या लहानपणच्या आठवणी भरभरून सांगते. पूर्वी लहान-लहान पाहिलेली मुलं आता पालक म्हणून आपल्या चिमुरड्यांना घेऊन त्याच विश्वासाने बालभवनात येताना बघून ही बालभवनची ताई आनंदून जाते आणि तेवढ्याच उत्साहाने ह्या नवीन चिमुरड्यांनाही सामावून घेतो. तायांनी प्रेमाने जपलेले हे मुलांचे वेगळेपण म्हणजे मुलांसाठी रेशमी संस्कारांची शिदोरीच असते जी कितीतरी वेगवेगळ्या गोष्टी ध्यासाने करणारी मुलं घडवत रहाते. पर्यावरणास पूरक घरे बांधणारा वास्तुविशारद कौस्तुभ, शेतीमध्ये पीएच.डी. करणारी गिरीजा, जंगलात एकटं रहात शिंगचोचा (hornbill) पक्ष्यांवर अभ्यास करणारी अमृता, हिमालयात मुलांमध्ये रमणारा चिन्मय, पुण्याजवळ शेतात मातीचं घर बांधून त्यात रहात शेती करणाऱ्या अदिती-अपूर्वा, अभिनव मधून जी.डी. आर्टस् कमर्शिअल व नंतर एम.ए. इंडॉलॉजी केल्यावर नोकरी करतानाच संध्याकाळी बालभवनचा गट घ्यायला उत्साहाने येणारी कलावंत रसिका अशी आपल्या आवडीची वाट निवडून आनंदाने व ध्यासाने आपापली कामं करणारी मुलं बघणं खूप आनंददायी व प्रेरणादायी आहे. 'स्वप्ने बघू उद्याची, हिंमत करू मनाची, इथुनी पाहू प्रत्यक्षाचे विराट क्षितिज पुढे, आम्ही मिळवू पंख नवे, आम्हाला बालभवन हवे' या बालभवनच्या गीतातील ओळी सार्थ करणारे आहे.

●●●